# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)

काकडे बीझ आयकॉन, चौथा मजला, ई-स्क्वेअर जवळ,
पुणे विद्यापीठ रोड, अशोक नगर, शिवाजी नगर, पुणे -४११०१६.
दूरध्वनी क्रमांक: (का.) : ०२०-२५५७७११९, २५५७७१००
ई-मेल: srapune@yahoo.in वेबसाईट: www.srapune.gov.in


स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.झोपुप्रा/अपिल/ २८५०-४ /२०२६

दिनांक :-०९/०६/२०२६.

**कार्यालयीन परिपत्रक क्र.:- ०५/२०२६ .**

विषय :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामध्ये सचिव स्तरावर अपिल दाखल करण्यासाठी कालावधी निश्चित करण्याबाबत...

संदर्भ:-

१. महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो-२००४/प्र.क.-२१३/झोपसु-१, दि.३०.०६.२००५
२. महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास अधिनियम १९७१) चे कलम ३ (क)
३. महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३(ड)
४. महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३५ (१)
५. महाराष्ट्र शासन राजपत्र, गृहनिर्माण विभाग, दि.२६.०९.२०२५

प्रस्तावना-

संदर्भ क्र.०१ नुसार, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र.झो.पु.यो-२००४/प्र.क्र.२१३/झो.प.सु-१ दि.३०.०६.२००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे.

संदर्भ क्र.०२ नुसार, झोपडपट्टी क्षेत्रातील अनुसूचीत नमुद केलेप्रमाणे झोपडपट्टी क्षेत्र घोषित करण्यात येते.

संदर्भ क्र.०३ नुसार, झोपडपट्टी क्षेत्रातील अनुसूचीत नमुद केलेप्रमाणे झोपडपट्टी निर्मूलन क्षेत्र घोषित करण्यात येते.

संदर्भ क्र.४ अन्वये महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३एक्स, ३ वाय व ३ झेड मधील तरतुदीनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्ट्यांचे सर्व्हेक्षण करुन झोपडीधारकांची पात्रता यादी उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी यांचेमार्फत प्रसिध्द करण्यात येते.

संदर्भ क्र.५ अन्वये शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३५ चे पोट कलम (१) च्या प्रयोजनांसाठी सक्षम प्राधिकाऱ्याने काढलेल्या अथवा दिलेल्या कोणत्याही नोटीशीने, ओदशाने वा निदेशाने बाधित झालेल्या व्यक्तीस ज्याच्याकडे अपिल दाखल करता येईल असा अपिलीय अधिकारी म्हणुन सचिव तथा अपर जिल्हाधिकारी

झोपडपट्टी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे किंवा त्यास समकक्ष पद धारण करणारा अधिकारी यांची नियुक्ती केलेली आहे.

त्यानुसार, सक्षम प्राधिकारी यांच्या आदेशाव्दारे किंवा निदेश यामुळे बाधित झालेला कोणताही व्यक्ती सचिव तथा अपर जिल्हाधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे किंवा त्यास समकक्ष पद धारण करणारा अधिकारी यांचेकडे ३० दिवसांचे आत अपिल दाखल करु शकतात.

तथापि, झोपडपट्टी योजनेतील अंतिम यादी प्रसिध्द झाल्यानंतर विहित मुदतीत अपिल दाखल न करता झोपडपट्टी निर्मूलन क्षेत्रावरील पुर्नवसन इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतरही झोपडपट्टीधारक अपिल दाखल करतात, अशी बाब प्राधिकरणाच्या निर्दशनास येत आहे. यामुळे अशा प्रकरणी संबंधित अपिलांच्या झोपडीचे स्थळपहाणी करणे, पात्रता/अपात्रता बाबत निर्णय घेताना अडचणी येत असल्याचे दिसते.

वरील सर्व बाबींचा विचार करता, सक्षम प्राधिकारी यांचे निर्णयाने व्यथित झालेले अपात्र झोपडीधारक/कोणतेही व्यक्ती यांना पात्रतेसाठी अपिल दाखल करण्याची कालमर्यादा व कार्यपध्दतीत सुसुत्रता आणण्याची बाब झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या विचाराधीन होती.

परिपत्रक:-

१. संबंधित झोपडपट्टी योजनेतील झोपडपट्टीवासियांची अंतिम (पात्रता/अपात्रता) यादी प्रसिध्द झाल्यानंतर १८० दिवसांचे आत अथवा महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ (ड) अन्वये संबंधित झोपडपट्टीचे निर्मूलन आदेश निघाल्यानंतर (विनिदिष्ट करण्यात आलेल्या इमारती पाडून टाकण्याचा आदेश निघाल्यानंतर) १२० दिवसांचे आत सचिव, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांचेकडे यांचेकडे अपिल दाखल करता येईल. तद्नंतर प्राप्त अपिलावर कोणताही निर्णय न घेता निकाली काढण्यात येतील. सदर निदेश सर्व झोपडपट्टी पुनर्वसन योजनांकरीता या परिपत्रकाच्या दिनांकापासुन लागू असेल.

२. सचिव, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांचेकडे दाखल अपिलावर पारित झालेला निर्णय मान्य नसल्यास अपिलकर्ता महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३५ (१अ) अन्वये मा. तक्रार निवारण समीतीकडे ३० दिवसांचे आत व्दितीय अपिल दाखल करु शकतात.

सदर परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू राहिल.

9/1/24

(सतीशकुमार द. खडके, (भा. प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे

प्रत-

सर्व विभाग प्रमुख, झोपुप्रा, पुणे.